**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-I JANUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# लोककवी वामनदादा कर्डक हयांच्या गीतरचनेतील बुध्द–आंबेडकरी दर्शन : आस्वाद आणि चिंतन

**प्रा.डॉ. सुरेश खोब्रागडे**
विदर्भ कला–वाणिज्य महाविद्यालय,
लाखनी, ता. लाखनी, जि. भंडारा

**प्रस्तावना :–**

आंबेडकरी चळवळीला बळ देण्याचे महत्वाचे कार्य लोककलेच्या माध्येमातून अनेक शाहिरांनी, कवी, कलावंतानी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जलशांची ताकद माहीत होती. ' माझ्या कित्येक भाषणांची बरोबरी एक जलसा करु शकतो ' असा त्यांचा आत्मविश्वास होता. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकर अशा अनेक शाहिरांनी आपले योगदान दिले. मार्क्सवादाच्या प्रभावातून अण्णाभाऊ साठयांनी आपला कलाप्रवास सुरु केला आणि पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या प्रभावातून आपली लोककला जनमानसात रुजविली. डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाने, त्यांच्या झंझावाती प्रवासाने अनेक शाहीर, कलावंत, कवी प्रभावित झाले. पट्ठे बापुराव, विठ्ठल उमप हयांनीही आपली लेखणी समाजप्रबोधानासाठी झिजविली. अशा या अनेक कलावंतात लोककवी वामनदादा कर्डक हयांचे अतिशय महत्वपूर्ण असे स्थान आहे. आंबेडकरी चळवळीत स्फुलिंग चेतविणारे कवी म्हणून, ऊर्जा निर्माण करणारे स्फुर्तिशील गीतकार म्हणून वामनदादांना ओळखले जाते. अतिशय दारिद्रयात राहून कलेशी आणि आंबेडकरी चळवळीशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहणारे निष्ठावंत, कलंदर लोककवी म्हणून अत्यंत गौरवाने वामनदादाचा उल्लेख केला जातो. त्यांची गीते पाहिली तर त्यातील वास्तविकता जिवंत वाटते. ज्यांना बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची चळवळ खऱ्या अर्थाने कळली तोच इतकी आशससमृध्द आणि विलक्षण सौंदर्यलक्षी रचना निर्माण करु शकतो. चळवळीचे विघटन, माणसांचा स्वार्थ, संपुष्ठात आलेली अनुयायातील आंबेडकरनिष्ठा अशा राख होत असलेल्या आंबेडकरी व्यवस्थेचे सूक्ष्म बारकावे अचूक टिपत अत्यंत ताकदीने हया माणसाने निर्जिव व्यवस्थेच्या तनामनात, रोमारोमात नवचैतन्य पेरण्याचे काम केले. फाटक्या आयुष्याची पर्वा न करता केवळ समाजाला पूर्ण पांघरुन घालण्यासाठीची त्याची तगमग, त्याची कळकळ विदीर्ण आणि अस्वस्थ करणारी आहे. त्यांच्या गीतात डॉ.आंबेडकर, तथागत बुध्द आणि आंबेडकरी चळवळ पाहायला मिळते. चळवळीचे अनेक कंगोरे, अनेक आयाम बारीकसारीक तपशिलांसह एकवटल्याचा तिथे प्रत्यय येतो. गदगदा हलवून जागे करणारी त्यांची गीते खऱ्या अर्थाने क्रांतिगीते आहेत. त्यांच्या गीतातील रुपकात्मकता आणि प्रतिमा अतिशय भावस्पर्शी अशा आहेत. शाळेत न जाता त्यांनी काही लोकांचा आधार घेऊन अक्षर ओळख करुन घेतली. दहेलवी नावाच्या गुरुजीकडून ते बाराखडी, मूळाक्षरे शिकले. पुढे दुकानाच्या पाटया वाचून, बोर्ड वाचून शिकू लागले आणि एकेक अक्षर जोडून शब्द लिहू लागले. अतिशय प्रतिकूल गरीब परिस्थितीतूनही प्रत्यक्ष बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणांच्या आणि कार्याच्या प्रभावातून ते चळवळीत उतरले आणि आपल्या क्रांतिकारी गीताने अखखा महाराष्ट्र त्यांनी जागवून सोडला. ते सतत लिहीत आणि गात राहिले.

**वामनदादाच्या कवितेतील बुध्द–भीमदर्शन :–**

वामनदादाच्या कवितेवर तथागत गौतम बुध्द आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सम्यक विचारांचा विलक्षण प्रभाव आहे. गुरु–शिष्याच्या कार्य–कर्तुत्वाने ते भाराहून गेलेले आहेत. दुष्ट रुढींचा विनाश करण्यासाठी, काळोखावर मात करण्यासाठी बुध्दानंतर बुध्द भूमीवर येऊन सारा आसमंत प्रकाशमान केल्याचे वामनदादा म्हणतात. बाबासाहेबाला अरुण, करुणाघना अशा उपमा देतात. ज्यांनी सतत दलित–शोषीतांचा छळ केला त्यांच्यासाठी बाबासाहेब कर्दनकाळ असल्याचे त्यांना वाटते. डॉ.आंबेडकरांनी समस्त भारतीय समाजाला दिव्य दृष्टी दिली. ते शरीराने मरण पावले असले तरी कीर्तीरुपाने अमर असल्याचे वामनदादांना वाटते. ते म्हणतात,

**“ ऐक्याच्या रुपात, ध्येयाच्या दीपात**
**जळताहे भीम माझा होऊनी वात**
**मानवी धम्मात, समता सुमात**
**दु:खितांच्या शोषितांच्या बसे उत्थानात**
**जिथे भीम नाही, तो मुक्ति मार्ग नाही ।। ”[१] (‘कीर्तीला मृत्यू नाही’, पृ.७०)**

दीनदुबळया गरीब बांधवाच्या अशक्त शरीरात ताकद पेरुन त्यांना बलवान, शक्तिमान करण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. स्वत: उच्चशिक्षित होऊन आपल्या समाजबांधवांना शिक्षणासाठी प्रवृत्त केले. त्यांना माणूसकीची, स्वाभीमानाची, अस्मितेची ओळख करुन जगण्यातला गर्द काळोख मिटवून टाकला. हे त्यांचे अभूतपूर्व कार्य पाहून वामनदादा गदगदून जातात. डॉ.आंबेडकरांनी बुध्दधम्माचा मार्ग स्वीकारला त्या क्षणाला ते सुवर्ण घडी म्हणतात. जुन्या प्रथा–परंपरा सोडून नवी दृष्टी जाणून घेऊन नवे जीवन जगण्यासाठी वामनदादा आपल्या बांधवाना प्रेरीत करताना म्हणतात,

**“ आली आली रे सुवर्ण घडी । जाग आता नरा तातडी**
**जागवाया तुला, बुध्द पुन्हा आला, खोल दाराची वेडया कडी**
**संपली ती निराशा निशा । गंध हर्षाने उधळी उषा**
**फाकली नव प्रभा तेज आले नभा भानु दाराशी आहे उभा**
**झाली पूर्व दिशा तांबडी, सोड आता तरी गोधडी ।।” [२] (गंध हर्षाने उधळी, पृ.६६ )**

जिथे द्वेषाचा लवलेश नाही, जिथे समता आहे, एकता आहे, प्रेमभाव आहे. अशा बौध्द धम्माचा मार्गच आपल्याला तारु शकतो, यावर वामनदादाला विश्वास आहे. म्हणूनच सकल जणांना ते जागे करु लागतात. डॉ.आंबेडकरांच्या रुपात सूर्य दाराशी आला तरिही लोक गोधडी पांघरुन झोपल्याचे वामनदादांना दु:ख आहे. ते स्वत:ला भीम युगाचा बेटा समजतात. तथागताची वाणी, जोतिबाची गाणी समजून क्रांतिचा नारा देऊन स्वत:ला वादळवारा असल्याचे सांगतात. रक्तपिणाऱ्या साऱ्या भांडवलदारांना आपण लोळवू शकतो हा त्यांचा आत्मविश्वास डॉ.आंबेडकरांच्या लढयातून, चळवळीतून आल्यामुळेच वामनदादांना एवढे बळ मिळाल्याचे स्पष्ट दिसते. बऱ्याच क्रांतीगीतातून त्यांची बुध्द–भीमाप्रती असलेली निष्ठा पाहायला मिळते. भीमयुगातील तरुणांचे जीवन त्या महामानवांसारखे असावे असे वामनदादांना वाटते. ते समाजाला सतत सावधानतेचा इशारा देतात. डॉ.आंबेडकरांच्या रितेपणाची पोकळी त्यांना अस्वस्थ करते. आता

स्वत:च स्वत:चा उध्दार करण्यासाठी आपण सज्ज असलो पाहिजे असे त्यांना वाटते. यातील त्यांचा करुणाभाव, समाजाशी असलेली प्रामाणिक वृत्ती पाहायला मिळते.

**" कुणी माणसाला इथे हीन लेखी**
**कुणी माणसाला इथे दीन लेखी**
**तरी समतेसाठी जिथे युध्द आहे**
**सागर मनाचा जिथे शुध्द आहे**
**तिथे बुध्द आहे तिथे बुध्द आहे "[३] ( जिथे बुध्द आहे. पृ.५३ )**

अशी बुध्दाची महत्ती ते सांगतात. जगाचे जीवन उजळण्यासाठी बुध्दाच्याच मार्गावरुन वळले पाहिजे असा उपदेश वामनदादा करताना दिसतात. जीवनाचे फार मोठे वास्तववादी तत्वज्ञान ते आपल्या गीतातून प्रकर्षाने मांडतात. दि. १४ ऑक्टोबर १९५६ साली धम्मदीक्षचे चौफेर पसरलेले तेज पाहून वामनदादांना हर्ष झाला. ते म्हणतात,

**" तो श्रावस्तीचा वारा तो भारत व्यापी सारा ।**
**ती राजगृहाची कारा उघडी मुक्तीच्या दारा ।**
**वामन भूचा तारा काल पाहावयाला आली ।**
**पाहून म्हणे वैशाली पिंपळाच्या झाडाखाली ॥"४ (, १९५६ साली, पृ. ४२)**

या गीतातील 'श्रावस्तीचा वारा ' ही प्रतिमा व्यापक अशी आहे. श्रावस्तीवरुन आलेल्या बुध्दाच्या सम्यक मार्गानेच सारा भारत देश व्यापला असल्याचे त्यांना त्यातून सांगायचे आहे. कविवर्य बा.सी. मर्ढेकरानी आपल्या एका कवितेत 'बुध्दगयेचा पिवळा वारा' अशी नवीन प्रतिमा मांडली होती. त्यातील व्यंजनार्थ वामनदादाच्या भूमिकेसारखाच आहे. त्या प्रतिमेतून त्यांची अलंकारप्रचूर सौंदर्यसंपन्न भाषा पाहायला मिळते. कित्येक कोटी कुळाचा उध्दार डॉ.आंबेडकरांच्या जन्मामुळे झाल्याचे वामनदादा आपल्या एका गीतातून सांगतात. ते म्हणतात,

**"काल कवडीमोल जिणे वामनचे होते**
**आज जुळे जगताशी प्रेमाचे नाते**
**बुध्दाकडे जनता वळे**
**भीमा तुझ्या जन्मामुळे ॥"५ (भीमा तुझ्या जन्मामुळे ,पृ.१)**

डॉ.आंबेडकरांनी आपल्या तेजाने सारा काळोख दूर केला. कुजनाऱ्या वृक्षासारखा समाज होता त्या समाजाला आज हिरवी पाने लागून अमृताची त्याला फळे आल्याचे रुपकात्मक वर्णन कवी करताना दिसतात. त्यातील प्रतिकात्मकता व्यापक अन्वयार्थ प्रकट करताना दिसतो. 'बलवान गडी बलदंडा जणु पोलादाचा पिंड/हलविण्यास भारत खंड । ठोकुणी आपुला दंड' अशी नावीन्यपूर्ण आशयघन विशेषणे डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्व विशद करण्यासाठी ते लावतात. अशा वीररसपूर्ण शब्दाने त्यांच्या गीतांना क्रांतीगीताचेच स्वरुप प्राप्त होते.

वामनदादा कर्डकांनी अत्यंत दारिद्रयात राहूनही चळवळीशी प्रामाणिकता दाखविली. डॉ. आंबेडकरांच्या विचारांशिवाय समाजाला तरणोपाय नसल्याचे त्यांना कळून चुकले होते. म्हणूनच त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या अंगीकारासाठी वारंवार समाजाला तळमळीने सांगितले,

**“ भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते ।**
**तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते”**

हे संपूर्ण गीत समाजाची कानउघाडणी करणारे असे आहे. जाज्वल्य आंबेडकरनिष्ठा गमावून बसलेल्या समाजाची कशी गत होते हे अतिशय संवेदनशीलपणे कवी इथे अधोरेखीत करतात. शब्दांची लय आणि त्यातील नादसंवेदना विलक्षण मनोवेधक आहेत. ‘तुझीच कमाई’ या गीतात त्यांनी डॉ. आंबेडकरांना ‘भीमाई’ या प्रतिमेने गौरविले आहे. आई या शब्दाने त्यांना बाबासाहेबांना संबोधले आहे. त्या गीतात रुपक साधताना ते म्हणतात,

**“सतधम्म धेनु दिलीस दुधाळ**
**मिळे दुध आम्हा सदा सर्वकाळ**
**त्यातलीच आम्ही चाखतो मलाई, कुणाचेच काही.”[६] (तुझीच कमाई, पृ.५, )**

बुध्द धम्माला वामनदादा दुधाळ गाय म्हणतात. ती गाय सदासर्वकाळ दुध देते, मलाई देते. ही सर्व कमाई डॉ.आंबेडकरांचीच असल्याचे कवी प्रतिपादन करतात. वाळलेल्या फुलवेलींना पाणी घालून फुलविण्याचे काम डॉ. आंबेढकरांनी केले. आज हा समाज सन्मानाने जगतो. ही सर्व कमाई डॉ. आंबेडकरांचीच आहे असे छातीठोकपणे कवी सांगतात. त्यांनी बुध्दाचा मार्ग स्वीकारुन जे त्रिसरण आणि पंचशील दिले त्यातून ‘बहुजन हिताय आणि बहुजन सुखाय’ चा मार्ग गवसल्याचे कवीला वाटते. बुध्दधम्माचे महानत्व सांगतांना कवी ‘बुध्दाच्या चरणी’ या कवितेत म्हणतात,

**“इथे नाही जातीयवाद ना पोकळ वर्णभेद**
**सर्वावरती करितो प्रीती माझा गौतम बुध्द**
**दार खुले हे सर्वांना, शूद्रांना चांडाळांना**
**साळी, माळी, ब्राह्मण कोळी । विलीन व्हारे त्रिसरणी”[७] (बुध्दाच्या चरणी, पृ.७, )**

या धम्मात विंटाळ नाही. तिथे बंधुत्वाचे नाते आहे. देव, दैव हया गोष्टी तिथे अतिबात नसल्याचे धम्माचे वैशिष्टये कवी सांगतात. हिंदूधर्माची कांबळी फेकून बुध्दाची समतेची निळी शाल पांघरण्याचा ते सल्ला देतात.

कविवर्य वामनदादा कर्डकांचे अतिशय गाजलेले ‘तुफानातले दिवे’ हे गीत आहे. समाजाला जागविणारे, चेतविणारे अशा त्या गीताने कार्यकर्त्यात नवा जोम, उत्साह आणि स्फुलिंग पेटविण्याची ताकद येते. आपल्या समग्र समाजाला ‘तुफानातले दिवे ’ संबोधून हे विझविण्यासाठी प्रतिगामी शक्ती कसे प्रयत्न करतात आणि हे सर्व करुनही ‘हया वाऱ्याने मावळणारी जात आमुची नव्हे’, असा खंबीर बाणा ते प्रकट करतात. प्रतिगाम्याच्या वाऱ्याला ते ‘बिचारा दुबळा वारा’ असे संबोधतात. त्या वाऱ्याची निर्दयता आपले काहीच बिघडवू शकत नसल्याची स्वाभीमानी जाणीव त्यांना आहे. ते म्हणतात,

**“ तुफानातले दिवे आम्ही आम्ही तुफानातले दिवे**
**तुफान वारा, पाऊस धारा मुळी न आम्हा शिवे ।। धृ।।**
**हल्यावरती होती हल्ले**
**अभंग अमुचे बाले किल्ले**
**असाच ताठर माथा आमुचा**
**जरा न खाली लवे ।।”[८] ( तुफानातले दिव, पृ.१०)**

समाजाला नवे आत्मभान आणि आत्मबळ देणारी एकूणच त्याची कविता आहे. 'जळू परंतु धरती उजळू, प्रकाश येथे असाच उधळू ' असा मोठा आशावाद आणि आत्मविश्वास त्यांच्यात आहे. समाजात संकटाची चाहूल लागल्याचे दिसताच कवीला डॉ.आंबेडकरांच्या मनगटाची आठवण येते. आंबेडकरी चळवळीचे तुकडे–तुकडे झाल्याचे पाहून ते विलक्षण अस्वस्थ होतात. स्वार्थापोटी स्वत:चीच झोळी भरण्यात, आपलेच बंगले बांधण्यात लोक मश्गुल झालेत. परक्याच्या दारात पाणी भरणाऱ्यांची ते फिरकी घेतात. 'याच्या–त्याच्या' दारात गेलेल्यानांही जो–तो सॅल्युट ठोकू लागल्याचे विदीर्ण करणारे चित्र मांडताना कवी म्हणतो,

**''बसले कोणी माडीमाधी**
**बसले कोणी गाडीमधी**
**याला बी वामन, त्याला बी वामन**
**रामराम कराया लागला''[९] ( पक्ष भीमाचा भंगला, पृ.२० )**

अंतर्मुख होऊन चिंतन करायला लावणारी त्यांची कविता आहे. समाजासाठी डॉ.आंबेडकरांनी कष्ट उपसले, अहोरात्र परिश्रम करुन दिनदुबळया समाजाला जुलमी जगतातून बाहेर काढले. 'दिधले भिमाईने तुम्ही अमृत चाखले, सांगा कुणी कुणी इथे इमान राखले', असा सवाल कवी समस्त समाजाला करतात. वर्तमान परिस्थितीचे पोस्टमार्टम करण्याची कवीची शैली अनोखी आहे. विविध प्रतिमा, प्रतीके आणि रुपकांचा आधार घेऊन प्रसंगी उपरोधीक शैलीने ते दृष्टवृत्ती, प्रवृत्तींचे चिमटे काढतात. ही सगळी परिस्थिती पाहून 'मला चीड येत नाही हाच माझा गुन्हा, दोष देऊ कुणा' अशी मनातील खंतही ते अस्वस्थपणे अभिव्यक्त करतात. त्यांच्या मनाची चाललेली घालमेल अतिशय मर्मस्पर्शीपणे कवितेतून पाहायला मिळते. आजुबाजूची परिस्थिती पाहून, अन्याय–अत्याचार पाहून स्वत:ला ते अपराधी समजू लागतात. डॉ.आंबेडकरांच्या उणेपणाची त्यांना जाणीव होते. आपल्या भावना व्यक्त करताना ते म्हणतात,

**''क्रूर कठोर काळाशी जरी गाठ होती माझी**
**भीम माझ्यामध्ये होता, मान ताठ होती माझी**
**आज माझ्यातला भीम इथं मीच केला उणा ।**
**दोष देऊ कुणा......''[१०] ( मला चीड येत नाही, पृ.७६ )**

वामनदादाच्या रोमारोमात डॉ.आंबेडकर भरलेले आहेत. डॉ.यशवंत मनोहरांच्या 'जपून रे माझ्या फिनिक्स पक्षानो' या आशयाची त्यांची 'जपून पडू दे पाय पोरा' ही कविता वाटते. प्रतिगाम्यांच्या हल्ल्याची ते आठवण करुन देतात. आपण एका धुळीकणासारखे असून आपलाही खून होऊ शकतो असे त्यांना वाटते. त्यांच्या 'पहाट झाली' या कवितेत अतिशय नयनरम्य कलात्मकता पाहायला मिळते. त्यातील सौंदर्य उत्तम अशा रुपकामुळे विलोभनीय दृष्टाच आपल्या डोळयासमोर उभे राहते. भीमजयंतीचे वर्णन करतात, ते म्हणतात,

**'' पहाट झाली प्रभा म्हणाली भीम जयंती आली**
**चांदाची चांदणी येवून खाली वारा भीमाला घाली''[११] ( पहाट झाली, पृ.२३ )**

या गीतातील प्रतिमा, प्रतीके मंत्रमुग्ध करणाऱ्या आहेत. त्यातील तरल कल्पना मनोहारी वाटतात. त्या कवितेतील पुढला अंतरा पाहा–

**''सफेद साडीवर सफेद कन चोळी**
**लेवून आली गं गगनाची भोळी**
**ओवाळाया भीम सरण्याला**
**उतावळी ती झाली'' [१२] (पृ.३३, पहाट झाली)**

यातील भावमुग्धता, भावसौंदर्य अतिशय अलंकारिकपणे कवी रेखाटतात. यातील चित्रकाव्य मोहक आहे. वामनदादा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा निष्ठावंत भक्त आहे. 'होता मातीत पडलेला, होतो मातीत दडलेला, माझे सोनेच केले रे एका मोठया सराफाने' ही कवीला आत्मजाणीव आहे. आज 'लोक मला मुजरे करतात ते केवळ आणि केवळ भीमाच्याच प्रतापाने' असा त्यांना ठाम आत्मविश्वास आहे. डॉ. आंबेडकरांशिवाय, 'तुला चालताच इयाच नाय' असे समाजाला ते वारंवार सांगतात. 'जिथे भीम नाही, तो मुक्ति मार्ग नाही', 'भीम नष्ट होई तर मेली लोकशाही', असे डॉ.आंबेडकरांचे कर्तुत्व कवीला माहीत आहे. 'जयभीम माझा सन्मित्र' या कवितेत 'जयभीम' या शब्दाची ताकद दर्शविताना ते म्हणतात,

**'' जयभीम माझा सन्मित्र, जयभीम माझे गणगोत्र**
**संजीवनी जयभीम मंत्र, जयभीम दीनांचा सारथी**
**क्रांतीपथी चालवी सदा तो तोच आम्हाला भारती**
**जयभीम माझा सन्मित्र'' [१३] (पृ.६९, जयभीम माझा सन्मित्र )**

जयभीमला कवी यशाचा मार्ग समजतात. विद्या, विनय, शील अशी मांगल्याची त्रिमूर्ती म्हणजे जयभीम असल्याचे त्यांना वाटते. त्या शब्दात चैतन्यस्फूर्ती असल्यामुळेच नवा रंग पृथ्वीला चढल्याचे त्यांचे मत आहे. माणुसकीचा मळा पिकवायचा असेल तर 'पेर भीमाचा लळा शिवारी, पेर भीमाचा लळा रे' असा कवी समाजाला आवर्जून अधिकारवाणीने सल्ला देतात.

**समारोप :—**

लोककवी वामनदादा कर्डक हा आंबेडकरी चळवळीतील अतिशय महत्वाचा कवी होय. प्रतिकूल परिस्थितीतूनही तो चळवळीशी एकनिष्ठ राहिला. तथागत बुध्द आणि डॉ.आंबेडकर हे त्यांचे प्रेरणास्त्रोत होत. डॉ.आंबेडकरांचा त्याना सहवास लाभला होता. तत्कालिन चळवळ त्यांनी प्रत्यक्ष पाहिली आणि अनुभवली. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतरचीही आंबेडकरी चळवळ त्यांनी पाहिलेली आहे. बदललेले कार्यकर्ते, बदललेल्या भूमिका एकूणच बदललेला समाज पाहून हा माणूस धाय मोकलून अनेकदा रडला असेल. त्यांची गीते तथा कविता वाचून आपल्याला त्यांच्या अस्वस्थेतचा, वेदनेचा प्रत्यय येतो. कवी हा खरच संवेदनशील असतो, याचा प्रत्यय वामनदादा वाचून येतो. अतिशय अल्पशिक्षित असलेल्या वामनदादांनी विलक्षण नवनव्या प्रतिमा, प्रतीके आणि रुपकांच्या वापरातून आपले गीत फुलवले. उत्कट भावनांचा मेळ घालून तरल कल्पनाने त्यात कलात्मकता ओतली. शब्दोशब्दी त्यांची आंबेडकरनिष्ठा आणि आंबेडकरी समाजाबद्दलची बदलती परिमाणे अधोरेखीत करणारी त्यांची आत्यंतिक तळमळ पाहायला मिळते. आपल्या क्रांतिकारी लिखाणातून सदैव समाजाला जागृत करण्याचे महत्कार्य आयुष्यभर वामनदादांनी केले. झोपलेल्या समाजाला गदगदा हलविण्याची ताकद त्यांच्या शब्दात आहे. झोपेचे सोंग घेतलेल्यालाही ते चिमटे काढून जागे करतात. अतिशय सामर्थ्यशाली शब्दाने निर्जिवात प्राण ओतण्याच्या त्यांच्या कार्याला तोड नाही. कंपने, हादरे निर्माण करणारी त्यांची क्रांतिलिपी अपूर्व आहे. म्हणूनच वामनदादा जनामनाच्या ओठी आहेत.

**संदर्भ :–**

१. संपादक, आचार्य सूर्यकांत भगत, 'महान लोककवी वामनदादा कर्डक', सुधीर प्रकाशन, वर्धा, ६ डिसेंबर २००४, पृ.७०
२. तत्रैव, पृ. ६६
३. तत्रैव, पृ. ५३
४. तत्रैव, पृ. ४२
५. तत्रैव, पृ. १
६. तत्रैव, पृ. ५
७. तत्रैव, पृ. ७
८. तत्रैव, पृ. १०
९. तत्रैव, पृ. २०
१०. तत्रैव, पृ. ७६
११. तत्रैव, पृ. ३३
१२. तत्रैव, पृ. ३३
१३. तत्रैव, पृ. ६९